# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २८/०८/२०१९ सभा सुचना क्र. ०७ विषय पत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत -** |
| ५३ | दि. ०३/०७/२०१९ व दि. २४/०७/२०१९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्य/प्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक** |
| --- | **विनंती अर्ज – निरंक** |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव – निरंक** |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज -** |
| ५४ | विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे तसेच पुर्न:विनियोजन पत्रकास मान्यता देणे. |
| ५५ | Work Bank GEF assisted ESCBS Project अंतर्गत Unutilized Grant मधून ITS साठी Schedule Management System Software खरेदी करणेस व त्यासाठी M/S Amnex Infotechnologies Pvt. Ltd. यांचे निविदेतील दर स्विकारणेस मंजूरी मिळणेबाबत. |
| ५६ | महानगरपालिका क्षेत्रातील मुर्धा ते उत्तन या विभागातील बाजार फी लिलावाकरीता E-Auction आलेल्या बोली लिलाव रक्कमेस मंजूरी मिळणेबाबत. |
| ५७ | बांधकाम व निषकासन कचऱ्याचे (डेब्रिज) संकलन, वाहतुक, पुर्नचक्रीकरण करणे कामाच्या दरांना मान्यता देणेबाबत. |
| ५८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, दुभाजके इत्यादी ठिकाणी निगा व देखभाल करणेकामी ठेका पध्दतीने मजूर पुरवठा करणेकामास मुदतवाढ मिळणेबाबत. |
| ५९ | अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेश, सेफ्टी फायर सुट व इतर साहित्य खरेदी करणेबाबत. |
| ६० | सन २०१९-२० या वर्षात मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना विविध कल्याणकारी योजनांतर्गत डी.बी.टी. या योजनेव्दारे वाटप वस्तुस्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा (DBT) करणेकरिता दर मंजूरीबाबत. |
| ६१ | भारतरत्न पंडित भिमसेन जोशी व भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय व अन्य वैद्यकिय आरोग्य विभागात ठोक मानधनावर कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांना 06 महिन्यांसाठी नियुक्तीस नवीकरण करणेबाबत. |
| ६२ | भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालयातील सर्व सेवा चालु ठेवण्याबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २४/०७/२०१९ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ४३) |
| ६३ | महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ मधील व सलग्न कायद्यामधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीकरिता सल्लागार नेमणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २४/०७/२०१९ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ४४) |
| ६४ | रस्ते फेरीवाला मुक्त ठेवणेकामी दिलेल्या कार्यादेशाची मुदतवाढ देणे व झालेल्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत. |
| ६५ | निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ६६ | वाहने वाहनचालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाड्याने देणे कामाच्या निविदेस मुदतवाढ देणेबाबत. |
| ६७ | वैद्यकिय विभागाकरीता आवश्यक डास नाशके व अळी नाशके खरेदी करणेकामी मागवण्यात आलेल्या निविदांचे दर मंजूर करणेबाबत. |
| ६८ | वैद्यकिय विभागाकरीता आवश्यक औषधे, सर्जिकल मटेरीयल, लॅब मटेरीयल खरेदी करणेकामी मागविण्यात आलेल्या निविदांचे दर मंजूर करणेबाबत. |
| ६९ | वैद्यकिय विभागा अंतर्गत भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालयाकरीता आवश्यक उपकरणे, साहित्य व फर्निचर मागवण्यात आलेल्या निविदांचे दर मंजूर करणेबाबत. |

| | |
|---|---|
| ७० | प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत. (संगणक विभाग)<br>Post Implementation support services, Customization and new development for property tax and water tax application. (संगणक विभाग) |
| ७१ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९२ नुसार शिलकी पैशांची गुंतवणूक करणेबाबत. |
| ७२ | त्रैमासिक जमा-खर्चाच्या अनुपालन अहवालाबाबत. |
| ७३ | मालमत्ता कर आकारणी सर्वेक्षण कामाचा आढावा घेणे. |
| ७४ | महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत असलेल्या विभागांचा आढावा घेणे. |
| ७५ | फेरिवाला समिती, फेरिवाला सर्वेक्षण कामाचा आढावा घेणे. |
| ७६ | डॉ. मकरंद फुलझेले यांचे अपिलावर निर्णय घेणे. |
| ७७ | श्रीम. छाया अशोक आल्हाट यांचे अपिलावर निर्णय घेणे. |
| ७८ | अधिकारी/कर्मचाऱ्यांना लावलेल्या शास्तीवर निर्णय घेणे. |
| ७९ | मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग)<br>मालमत्ता कर विभागाची सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता कराची देयक छपाई करणे. |
| ८० | मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग)<br>मिरा भाईंदर महानगरपालिका सन २०१९ ची दैनंदिनी छपाई करणे. |
| ८१ | मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग)<br>मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना तसेच वाहनचालक यांना गणवेश (शिलाईसह) पुरवठा करणेबाबत. |
| ८२ | मा. आयुक्त सो. यांनी केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (आपत्ती व्यवस्थापन विभाग)<br>मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन्मा. नगरसेवक यांच्या प्रभाग निधीमधून सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत. |
| ८३ | मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ८४ | निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ८५ | विवीध कामांच्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| ८६ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे कामीच्या निविदेस मंजुरी देणेबाबत. (आपत्ती व्यवस्थापन विभाग) |
| ८७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये भाईंदर (पूर्व) भागामध्ये मा. पोलीस विभागाच्या मागणीनुसार सी.सी.टी.व्ही. पुरवठा करणे व यंत्रणा कार्यान्वित करणे. |
| — | <u>**शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे**</u> |
| — | <u>**समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल - निरंक**</u> |

**दिनांक :- २२/०८/२०१९**

**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

स्थायी समिति सभा
दि. २८/८/२०१८

अर्जदार : डॉ. मकरंद फुलझेले
सर्जन, इंदिरा गांधी हॉस्पीटल,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

दिनांक : २५-०९-२०१८

प्रकरण क्र. ७६ करिता

प्रति,
मा. सभापती सो.,
स्थायी समिती,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

विषय : लावण्यात आलेली शिक्षा रद्द करणे बाबत अपिल.
संदर्भ : जा.क्र.मनपा/आस्था/८४४/२०१८ दि. २८-०८-२०१८ रोजी प्राप्त पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वे आपणांस कळविण्यात येते की, मी महानगरपालिकेच्या सेवेत रूजू झाल्यापासुन ते २०१६ जुन पर्यंत देण्यात आलेला N.P.A. माझ्याकडून वसूल करण्यात यावा, असे म्हटले आहे. परंतु सदरच्या कालावधीमध्ये M.S. मेडीकल वैद्यकिय अधीक्ष पदाचा भार असल्याकारणाने व सध्या परिस्थितीकारणानुसार माझी प्रायव्हेट प्रॅक्टीस जवळजवळ शुन्यच झाल्याकारणाने ती रक्कम वसुल करण्यात येवू नये, अशी माझी नम्र विनंती आहे.

मी पालिका कामावर असताना झालेल्या विषाणूजन्य इंफेक्शनमुळे मी जवळजवळ ४ महिने मुंबई येथील लीलावती सारख्या महागडया हॉस्पीटलमध्ये (Tracheostomy – श्वासनलिका कट करुन मेटल टयूब आत टाकणे) उपचार घेत असल्याने माझे आधीच जबर आर्थिक नुकसान तसेच शारीरीक व मानसिक खच्चीकरण झालेले आहे. माझी तब्येत अजुनही पूर्ववत झालेली नाही. यामुळे प्राईव्हेट प्रॅक्टीसचा जास्त ताण मला घेता येत नाही. कृपया आपण माझी अडचण समजून घ्यावी.

९३९
प्राप्त
दि. २५/९/१८

या बरोबर २ वेतनवाढी रोखण्याचा निर्णय न्यायासंगत वाटत नाही. कारण N.P.A. देण्यासाठी लागणारा बॉन्ड मी कधीच भरून दिला नाही. व वेळोवेळी तोंडी किंवा लेखी मध्ये याविरुध्द भुमिका घेतली. माझ्यावरील उपचार अजुनही पूर्ण झालेले नसल्याने त्यासाठी तला आर्थिक जमवाजमव करणे क्रमप्राप्त आहे. याबाबत आपण सहानुभूतिपूर्वक विचार करून माझी शिक्षा रद्द करावी, ही आपणंस नम्र विनंती.

आपला विश्वासु,

डॉ. मकरंद फुलझेले

स्थायी समिती सभा
दि. २८/८/२०१९

श्रीम. छाया अशोक आल्हाट
(सफाई कामगार)
रुम नं.४८३, महात्मा फुले नगर,
जुना, बेलापूर रोड, कळवा, ता.जि. ठाणे

दि. ०१/०३/२०१९

प्रकरण क्र. ७७ करिता

प्रति,
मा. सभापती
स्थायी समिती सभापती
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम-१९७९ मधील नियम १८ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६(४) अन्वये अपिल दाखल करीत आहे.

संदर्भ :- जा.क्र.मनपा/आस्था/१७१८/२०१८-१९ दि.३१/०१/२०१९ रोजीचे आदेश

महोदय,

माझ्या विरुध्द प्रशासनाने जा.क्र.मनपा/आस्था/१७१८/२०१८-१९, दि.३१/०१/२०१९ अन्वये का ढलेल्या आदेशाविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम-१९७९ मधील नियम १८ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६(४) अंतर्गत तरतुदी अन्वये हे अपिल सादर करुन या अपिलाव्दारे माझेवर झालेल्या अन्यायावर कृपया सहानुभुतीपुर्वक विचार व्हावा, हि नम्र विनंती.

मी श्रीम. छाया अशोक आल्हाट, सफाई कामगार म्हणून मिरा-भाईंदर महानगरपालिकेत दि.०१/१०/१९९४ पासून कार्यरत असून दि.२१/०७/२००९ पर्यंत म्हणजेच ११ वर्षे १० महिने मी नियमित कामावर वन विभागात कार्यरत होते. माझ्या ११ वर्षे १०महिने सेवा कालावधीत मी कोणत्याही प्रकारे गैर वर्तन केल्याची नोंद नाही. परंतु दि.२२/०७/२००९ रोजी पासून माझे प्रकृतीमान चांगले नसल्याने मी कामावर गैरहजर राहिले. दरम्यान मला मानसिक त्रास होउन मी मानसिक दृष्टया कमजोर झाली व भ्रमिष्ठा सारखी इतरत्र भटकत होती. म्हणून मी खाजगी रित्या मानसिक तज्ञ डॉक्टराचे औषध उपचार सुरु केले. परंतु आर्थिक अडचण असल्यामुळे व माझे पती हे अपंग (दोन्ही पाय मांडीपासून नसल्याने) असल्याने त्याचे सुध्दा आजारपण यामुळे मासिक मिळणा-या तुटपुंज्या वेतनावर घर चालवणे जिकरीचे झाले व या आजारपणाचे खर्चासाठी पुष्कळ कर्ज झाले मासीक पगार कर्जात जावू लागला त्यामुळे नियमित पैशावरुन घरी वादविवाद होत असत या वादविवादामुळे मला मानसिक त्रास होऊन मी भ्रमिष्टा सारखे करु लागले त्यामुळे मी दि.२२/०७/२००९ पासून कामावर गैरहजर राहीले. मी अशिक्षित असून मला लिहिता वाचता येत नाही, तसेच माझे पती सुध्दा निरक्षर होते त्यामुळे घरी कोणीही शिकलेले नसल्याने मी किंवा माझे पती कार्यालयात कळवू शकले नाही. तसेच माझे मानसिक संतुलन ठिक नसल्याने कामावर नव्हते, व वेडयासारखी इकडे तिकडे फिरत होती. चांगल्या औषध उपचारांसाठी पैसे नसल्यामुळे मानसिक आजारातून बरे होण्यास मला जवळ जवळ ७ वर्षे ६ महिने इतका कालावधी लागला. ही वस्तुस्थिती सत्य व खरी आहे असे मी प्रामाणिकपणे महोदय आपणांस सांगु इच्छिते.

मी गैरहजर रहाणेपूर्वीची माझी ११ वर्षे १० महिने सेवा प्रामाणिकपणे केली असुन त्या सेवेच्या कालावधीत मी कधीही विनापरवानगी गैरहजर राहिलेली नाही. याबाबत कृपया आपण आस्थापना विभागातील माझे सेवा अभिलेख तपासले तर निर्देशनास येईल. महानगरपालिकेने माझ्या ११ वर्षे १० महिने इमानदारीने केलेल्या कामाचा विचार न करता ७ वर्षे ६ महिने मानसिक दृष्टया आजारी असल्याने गैरहजर राहीले म्हणून प्रशासनाने मला दि.०६/०१/२०१७ रोजी वैद्यकिय प्रमाणपत्रासह (काम करणेस सक्षम असल्याचे) कामावर घेण्यासाठी केलेल्या अर्जावर प्रशासनाने मला जा.क्र./मनपा/सा.प्र.वि/२३१/२०१६-२०१७, दि. २५/०५/२०१७ अन्वये मा. जिल्हा वैदयकिय मंडळाजवळ आजारमुक्त व काम करणेस सक्षम असल्याबाबत वैद्यकिय मत मागविले. मा. जिल्हा वैदयाकिय मंडळाचे दि. ०६/०६/२०१७ रोजी प्रमाणपत्र कार्यालयास प्राप्त झाले. वैदयकिय प्रमाणपत्र कार्यालयास प्राप्त झाले नंतर मला कामावर हजर करुन घेणे अपेक्षित असताना. जा.क्र./मनपा/आस्था/३९५/२०१७, दि.२३/०६/२०१७ अन्वये विना परवानगी गैरहजेरी बाबत कारणे दाखवा नोटीस बजावली सदर नोटीसीचा दि.२७/०६/२०१७ रोजी खुलासा केला, प्रशासनाने माझे नोटीसीचा खुलासा अमान्य केला व जा.क्र./मनपा/आस्था/८४/२०१८, दि.१३/०४/२०१७ अन्वये विनापरवानगी/गैरहजेरीबाबत चौकशी केली त्या चौकशीत मी कार्यालयास अनुपस्थित/गैरहजेरी बाबत आगावू न कळविल्याबाबत दोषी ठरविले

आहे, परंतु महोदय मी एक सफाई कामगार असुन अशिक्षित आहे. मला व माझे घरी कोणालाही लिहीता वाचता येत नाही. व कार्यालयास कळवावे असे घरी निरक्षर माणसे असल्यामुळे त्यांना माहित नाही त्यामुळे कोणीही कार्यालयास कळविलेले नाही तसेच माझी स्वतः चे मानसिक संतुलन बिघडले असल्याने व मी निरक्षर असल्याने मी सुध्दा कळवू शकले नाही असे चौकशी अधिका-यांना चौकशीत सर्व वस्तुस्थिती मी सांगितली होती परंतु त्यांनी माझे मागील ११ वर्षे १० महिने केलेल्या सेवेचा विचार करुन फक्त विना परवाना गैरहजेरी बाबत दोषी ठरविले. महानगरपालिका प्रशासनाने मी माझ्या गैरहजेरी बाबत कळविले नाही म्हणून संदर्भिय वरील आदेशान्वये कामावर घेताना चार प्रकारच्या शास्ती लादून माझेवर अन्याय केला आहे तो कृपया आपण दूर करावा अशी विनंती असून संदर्भिय आदेशान्वये माझेवर लादलेल्या शास्त्याचा तपशिल व त्या शास्त्याबाबत नियमातील तरतुदी अन्वये माझे म्हणणे मी संक्षिप्तपणे मांडत आहे.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ४७ (१) (ए) अंतर्गत तरतुदी अन्वये अनधिकृत अनुपस्थितीच्या कारणास्तव श्रीम. छाया अशोक आल्हाट (सफाई कामगार) यांचे सेवेतील खंड पडत असल्याने दि.२२/०७/२००९ ते दि.३०/०१/२०१९पर्यंतचा कालावधी सेवेतील समजण्यांत येत आहे तसेच खंडीत कालावधी सेवा निवृत्तीच्या प्रयोजनासाठी ग्राहय धरण्यांत येणार नाही.

महोदय, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(३) नुसार वर्ग-४ चे पदावर नियुक्ती प्राधिकारी मा.आयुक्त साहेब असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे कलम ४७ १ (ए) अंतर्गत तरतुदी अन्वये माझा गैरहजर कालावधी विनां वेतन सेवेतील खंड समजण्यास मंजुरी दिलेली आहे. सदर आदेश माझेवर अन्याय करणारा असून मी दि.२२/०७/२००९ पासून खाजगी डॉक्टराकडे औषध उपचार घेत असल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र दिले आहेत. त्यामुळे वैद्यकीय कारणास्तव मी गैरहजर असल्याने गैरहजर कालावधीतील सेवा खंडीत करुन दुरगामी परिणाम होणारी शास्ती लावली आहे. सदर शास्ती बाबत आदेशात कोणतेही सबळ कारण नमूद नाही. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे कलम ४७ (२) अंतर्गत तरतुदी अन्वये अनुपस्थितीचा कालावधी भुतलक्षी प्रभावाने वैद्यकीय कारणास्तव असाधारण रजा अर्हताकारी रजा मंजूर करावी, हि विनंती.

२) श्रीम. छाया अशोक आल्हाट (सफाई कामगार) सतत विनापरवानगी जास्त कालावधी गैरहजर राहिल्यामुळे त्याचे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ५ (१) (पाच) नुसार वेतन समय श्रेणीतील खालचे टप्यावर आणण्यांत येत आहे.

सदर नियमातील तरतुद पहाता मी कोणत्याही प्रकारे शिस्तभंग केलेला नाही असे प्रामाणिकपणे येथे नमुद करते कारण मी अशिक्षित असल्याने मला लिहिता वाचता येत नाही ही बाब प्रशासनाचे व चौकशी अधिकारी याचे निर्देशनास आणली आहे तसेच गैरहजर कालावधीत शिस्तभंग प्राधिकरणाने मला गैरहजेरी बाबत एकही नोटीस दिलेली नाही. त्यामुळे शिस्तभंग प्राधिकरण एकही नोटीस न देता शिस्तभंग केला म्हणून शिस्तभंग प्राधिकरणाने मला समान श्रेणीतील खालच्या टप्प्यावर आणणे चुकीचे आहे. यामुळे माझ्या पुढील सेवेवर त्याचा गंभीर परिणाम होणार असून या शास्ती बाबत आदेशात कोणतेही सबळ कारण नमूद केलेले नाही. त्यामुळे माझ्यावर लादलेली अन्यायकारक शास्ती रद्द करावी, हि विनंती.

३) श्रीम. छाया अशोक आल्हाट (सफाई कामगार) यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ५ (१) (४) अन्वये दोन वेतनवाढी भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने रोखण्याची शिक्षा फर्माविण्यांत येत आहे. मी महानगरपालिकेत अशिक्षित असल्यामुळे कार्यालयात वेळेत कळवू शकले नाही. म्हणून शिस्तभंग प्राधिकारी यांनी लादलेल्या शास्ती ही पुर्वग्रह दुषीत असून त्या शास्ती बाबत आदेशात सबळ कारणे नमूद करणे आवश्यक होते परंतु प्रशासनाने कारणे नमुद न करता रोखलेल्या दोन वेतनवाढी चुकीने रोखुन ठेवल्यामुळे माझेवर दिर्घकाळ परिणाम करणा-या आहेत. त्यामुळे सदर शास्ती रद्द करावी, हि विनंती.

४) श्रीम. छाया अशोक आल्हाट (सफाई कामगार) यांना मा.जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे यांचेकडिल दि.०२/०६/२०१७ रोजीचे काम करण्यास सक्षम असल्या बाबतचे प्रमाणपत्रानुसार या पुर्वीचा त्याचा सेवेतील सतत गैरहजर कालावधी पहाता त्यांना या आदेशाच्या दिनांकापासून फेर नियुक्ती समजून कामावर हजर करुन घेण्यांत येत आहे. मी दि.०६/०१/२०१७ रोजी पासून खाजगी डॉक्टराचे औषध उपचार घेतल्या बाबत वैद्यकीय प्रमाणपत्र जोडून कामावर हजर करुन घेण्यास विनंती केली त्या विनंतीनुसार महानगरपालिकेने मला गैरहजर कालावधी जास्त असल्याने जिल्हा शल्य चिकीत्सक

मंडळाजवळ वैद्यकीय तपासणीसाठी पाठविले त्याचे कडिल प्राप्त वैद्यकीय प्रमाणपत्र तपासणी दि.०२/०७/२०१७ रोजी कार्यालयास प्राप्त होऊन काम करणेस सक्षम असल्याचे प्रमाणपत्रात नमुद आहे. म्हणजेच मी दि.०६/०१/२०१७ रोजी कामावर घेण्यास अर्ज केल्या दिनांकास काम करण्यास सक्षम होती हे दिसून येते. परंतु प्रशासनाने मला कामावर हजर होण्यासाठी अर्ज केल्यानंतर विविध कारणांनी कामावर हजर करुन घेण्यास विलंब केला व दि.३१/०१/२०१९ पासून म्हणजे जवळ-जवळ दोन वर्ष पेक्षा अधिक कालावधी कामावर घेण्यास विलंब लावून माझेवर अन्याय केला व कामावर ज्यावेळी हजर करण्याचे दि.३१/०१/२०१९ चे आदेश दिले. त्या आदेशात आदेशाचे दिनांकापुर्वीची सेवा व गैरहजर कालावधी ग्राहय न धरता फेर नियुक्ती समजून कामावर हजर करुन घेणे बाबत आदेश दिले. परंतु या आदेशामध्ये माझ्या मागील ११ वर्षे १० महिने केलेली सेवा ग्राहय धरलेली नाही किंवा वैद्यकीय कारणास्तव गैरहजर राहिल्यास सेवा खंडीत करण्याबाबत नियमात तरतुद नाही. किंबहुना प्रशासनाने आदेशात मागील सेवा व वैद्यकीय कारणास्तव गैरहजर कालावधी पुढील सेवेसाठी ग्राहय न धरणे बाबत कारणे नमुद केलेली नाही अशा प्रकारे प्रशासन सोयीनुसार एक वेळ म्हणते मागील सेवा ग्राहय धरण्यांत येणार नाही, तर गैरहजर कालावधीही सेवेत ग्राहय धरला जाणार नाही. फेर नियुक्ती म्हणून नियुक्ती देण्यांत येते असेही आदेशात म्हटले आहे. अशा प्रकारे मी एक सफाई कामगार निरक्षर असून दि.०१/१०/१९९७ रोजी महानगरपालिका सेवेत कामाला लागले पासून ११ वर्षे १० महिने नियमीत एकही दिवस विना परवाना गैरहजर न रहाता इमाने इतबारे महानगरपालिकेत काम केले परंतु दि.२२/०७/२००९ पासून माझे मानसिक संतुलन बिघडल्यामुळेच मी गैरहजर होती व त्या गैरहजेरी बाबत माझे अशिक्षितपणामुळे कार्यालयास कळवू शकली नाही तसेच प्रशासनानेही या गैरहजर कालावधीत मला गैरहजर राहिल्याबाबत नोटीस दिलेली नाही जर नोटीस मिळाली असती तर मला त्याच वेळी माझे गैरहजेरी बाबत प्रशासनास कळविता आले असते. परंतु प्रशासनाने माझ्या गैर हजेरीचे कालावधीत कोणत्याही प्रकारे कार्यवाही केली नाही व ज्यावेळी मी स्वतः दि.०६/०१/२०१७ रोजी वैद्यकीय प्रमाणपत्रासह कामावर हजर करुन घेण्यासाठी विनंती केली त्यावेळी कामावर घेण्यास दोन वर्षाचा कालावधी घालवता व कामावर हजर करुन घेतानाचे आदेशात वरीलप्रमाणे नमुद चार प्रकारच्या शास्ती लादून मी विना परवाना गैरहजर राहिले हा फार मोठा गुन्हा केला असे प्रशासनाने मत झाल्याने माझे यापुर्वी केलेली सेवा ग्राहय न धरुन माझेवर अन्याय केला आहे.

तरी महोदयाना माझी नम्र विनंती आहे की, संदर्भिय दि.३१/०१/२०१९ रोजीचे आदेशात माझ्या गैरहजेरी बाबबत कोणतीही कारणे स्पष्टपणे नमुद न करता अन्यायकारक शास्ती लावण्यांत आलेली आहे. त्यामुळे दि.३१/०१/२०१९ रोजीच्या आदेशा अन्वये कामावर हजर करुन घेतानाच्या आदेशातील अ.क्र.१,२,३ व ४ मध्ये नमुद शास्ती ही नियमबाहय असून या शास्तीस कोणताही नियम अधिनियमाच्या आधार नाही केवळ मी एक अशिक्षित मागासवर्गीय महिला सफाई कामगार आहे म्हणून माझेवर अन्याय केला आहे अशी माझी धारणा आहे. त्यामुळे मी आपणांस विनम्रपुर्वक व कळकळीची विनंती करते की मला कामावर हजर करुन घेताना लावलेली शास्ती कृपया रद्द करावी. हि विनंती. तसेच मी महानगरपालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान केलेले नाही.

आपली नम्र

(छाया अशोक आल्हाट)
सफाई कामगार

स्थायी समिती सभा दि. २८/८/२०१९

प्रकरण क्र. ७८ करिता

दि. २०/०८/२०१९

प्रति,

मा. सभापती

स्थायी समिती सभा

मिरा-भाईंदर महानगरपालिका

विषय :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६(२) अन्वये अपिल शास्ती रद्द करणे बाबत...

संदर्भ :- जा.क्र.मनपा/आस्था/२९० ते ३०६/२०१९-२०२०, दि.२८/०५/२०१९ रोजीचे आदेश

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध राजकीय पक्षानी माहे जानेवारी-२०१८ ते नोव्हेंबर-२०१८ दरम्यान काही ठिकाणी वाढदिवसाचे मा. मुख्यमंत्री, मा. शिक्षणमंत्री, मा. केंद्रीस बांधकाम मंत्री याचे भाईंदरमध्ये आगमना प्रित्यर्थ स्वागत बोर्ड, होळी, नवरात्री, गणेशोत्सवा निमित्त भक्ताच्या स्वागताचे बोर्ड, मा. महापौर चषक, सि.एम. चषक इत्यादी कार्यक्रमाचे महानगरपालिकेची शहरात बोर्ड/बॅनर लावणेस परवानगी न घेता लावले गेले. शहरात अनधिकृतपणे लावले गेलेले बोर्ड/बॅनर प्रत्येक प्रभागातून बोर्ड/बॅनर प्रत्येक प्रभागातून बोर्ड/बॅनर निर्मुलन पथकाने त्वरित काढून टाकले परंतु श्री. कृष्णा गुप्ता या सामाजिक कार्यकर्त्याने शहरात लावण्यांत अलेले अनधिकृत व विना परवाना बोर्ड/बॅनर काढून बोर्ड/बॅनर लावलेल्यावर गुन्हा नोंदविण्याची मागणी केली होती.

प्रभाग कार्यालयाने अनधिकृत बोर्ड/बॅनर वेळीच काढलेले होते व अनधिकृत बोर्ड/बॅनर काढताना कोणीही काढणेस अटकाव केलेला नाही तसेच बोर्ड/बॅनर हे रात्रीचे वेळी लावले गेले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे सकाळी शहरात बोर्ड/बॅनर लावले गेल्याचे प्रभाग कार्यालयास निर्देशनास आल्यावर अनधिकृत बोर्ड/बॅनर पथकाने त्वरित संबंधित प्रभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील बोर्ड/बॅनर काढण्यात येत असत.

परंतु श्री. कृष्णा गुप्ता (सामाजिक कार्यकर्ते) यांनी वेळोवेळी लावले गेलेल्या अनधिकृत बोर्ड/बॅनरवर कारवाई करण्याबाबत व संबंधितावर गुन्हा नोंद करण्याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. त्याचे पत्राना प्रभाग अधिकारी यांनी बोर्ड/बॅनर काढले बाबत उत्तर दिलेले आहे. मात्र त्यांना उत्तर देताना काही वेळा विलंब झालेला आहे. सदर विलंब हा मुद्दामहून केलेला नाही तर प्रभाग अधिकारी याचे जवळ असलेले कार्यालयीन कामकाजाची व्याप्ती पहाता पत्रव्यवहार मोठया प्रमाणावर असतो. प्रभागात प्राप्त पत्रव्यवहार हा लिपीक/वरिष्ठ लिपीक/कनिष्ठ अभियंता असा पत्राचा प्रवास असतो. प्रभागाचे कामकाजाच्या तुलनेत कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने विहीत मुदतीत तक्रारीवर कार्यवाही झाली परंतु उत्तर दिले गेले नाही. किंबहुना उत्तर दिले परंतु तक्रारदार यांना संबंधित अनधिकृत बोर्ड/बॅनर लावणा-यावर गुन्हा नोंद का केला नाही? म्हणून श्री. कृष्णा गुप्ता (सामाजिक कार्यकर्ते) हे आग्रही होते. परंतु अनधिकृत बोर्ड/बॅनर काढते वेळी कोणीही अडथळा किंवा आडकाठी केलेली नाही तसेच कोणी बोर्ड/बॅनर लावले हे माहिती नसल्याने फक्त वेळीच तातडीने बोर्ड/बॅनर काढण्यांत आले. गुन्हा नोंद केला नाही ही वस्तुस्थिती आहे.

श्री. कृष्णा गुप्ता (सामाजिक कार्यकर्ते) हे वारंवार प्रशासनास तोच तोच उलट सुलट पत्रव्यवहार करुन गुन्हा नोंद केला नाही म्हणून पत्रव्यवहार करीत होते व गुन्हा नोंदविण्याची कारवाई न करणा-यांवर कलम ७२-(सी) अन्वये कारवाई करा अशी त्याची मागणी होती. श्री. कृष्णा गुप्ता (सामाजिक कार्यकर्ते) यांचे मागणीस प्रशासन बळी पडले व त्यांनी प्रभाग अधिकारी व अन्य विभागाचे वर्ग १ व २ चे अधिकारी यांना स्पष्टपणे कोणत्या पत्रावर त्यांना उत्तर दिले नाही याची खातरजमा न करता सरसकट सर्व प्रभाग अधिकारी व अन्य विभागाच्या वर्ग १ व २ च्या अधिका-यावर कलम ७२ (सी) अन्वये दंडाच्या शास्तीची कारवाई केली आहे. वास्तविक ज्या अधिकारी/कर्मचा-यांना दंड किंवा शास्ती लावायची आहे त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन १५ दिवसात संबंधिताकडून खुलासा मागविणे आवश्यक आहे व खुलासा असमाधानकारक वाटल्यास शिस्तभंग विषयक सक्षम प्राधिकारी नियमानुसार विभागीय चौकशी प्रस्तावित करुन चौकशीत दोषी आढळल्यास शास्ती लादता येते अशी नियमाची तरतुद असताना प्रशासनाने हुकुमशाहीने एकतर्फी वर्ग १ व २ च्या अधिका-यांना शास्ती लावलेली आहे. प्रशासनाने लावलेली शास्ती ही वर्ग-१ व २ च्या अधिका-यांना लावलेली असून प्रभाग कार्यालयास प्राप्त पत्रव्यवहार हा लिपीक/वरिष्ठ लिपीक असा प्रवास करुन अंतिम स्वाक्षरीसाठी प्रभाग अधिकारी यांचे जवळ येतो. परंतु प्रशासनाने वर्ग-३ चे कर्मचा-यांना दोषी न करता किंवा विचारपुस न करता वर्ग-१ व २ च्या अधिका-यांना दोषी ठरवणे सयुंक्तीक नसुन लावलेली शास्ती हो पुर्णपणे चुकीची व अन्यायकारक बाब आहे. ती रद्द करणेस विनंती आहे.

आपले नम्र

१. श्री. वासुदेव वि. शिरवळकर
२. श्री. सुदाम गोडसे
३. श्री संजय राठे
४. श्री. नरेंद्र पां. चव्हाण, प्र.क्र. ११४
५. श्री. गोविंद धोंडी परब. प्र.क्र. 02
६. श्री. चंद्रकांत बाबुराव बोरदे
७. श्री. अविनाश जाधव-
८.
९.
१०.

७६०८/३०/ -: का०म्रु

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकामं विभाग

## मा. स्थायी समिती सभा दि.२८ /08/2019

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ( ८४ ) :- निविदेस मान्यता देणेबाबत.

| अ क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | 438916_1 | भाईंदर (प) सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन गाव (टप्पा-२) रस्त्याचे रुंदीकरण व मजबूती करण करणे.<br>**मे. देव इंजिनिअर्स**<br><br>मे. गजानन कंस्ट्रक्शन<br>मे. श्री.जी. कंस्ट्रक्शन | रु.४३,६४,४९,२६९/-<br>रु.६३,६६,३८,४६२/-<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**रु.६१,१०,२८,९७६/-**<br>**(सन २०१९-२० च्या राज्यदरसुचीतील दराशी तुलना करता ०.५८% कमी दराची)**<br>रु.६४,१६,६६,१०७/-<br>रु.६५,४६,७२,३०६/- |
| २. | 446523_1 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गालगत असलेल्या विद्यमान अग्निशमन केंद्र इमारतीच्या जागेत कम्युनिटी हॉल बांधणे.<br>**मे. गजानन कन्स्ट्रक्शन**<br><br>मे. देव इंजिनिअर्स<br>मे. श्रीजी इंटरप्राईजेस | रु.२२,२८,१७,३७०/-<br>रू.३०,३०,६४,७३८/-<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**रु. २७,४०,००,०००/-**<br>**(सन २०१९-२० च्या राज्यदरसुचीतील दराशी तुलना करता ९.८०% जास्त दराची)**<br>रू.३१,३८,५९,४५०/-<br>रू.३२,२७,९५,९८३/- |
| ३. | 442683_1 | Scietific Dumpsite Land Reclamation Biomining, Resourse Recovery and Scientific Rejects Disposal at Uttan Dumpsite for Mira Bhaindar Municipal Corporation Works in MBMC Area | |

| DESCRIPTION | QTY | UNIT | Guruji Infrastructure Pvt. Ltd. | | Global Waste Management Cell Pvt.Ltd. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | RATE | AMOUNT | RATE | AMOUNT |
| ITEM NO.1<br>Scientific Dumpsite Land Reclamation through Bio-mining, Resource Recovery and Scientific Rejects Disposal at Uttan Dumpsite for Mira Bhaindar Municipal Corporation | 200000 | Cum | 471.00<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**469.00** | 94200000.00<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**93800000.00** | 712. | 142560000 |

वरील कामांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता (सा.बां)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

मा. स्थायी समिती सभा दि. २८/०८/२०१९.

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ८५ :- विविध कामांच्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) क्राँक्रीट रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करणे.
(अंदाजित रक्कम रु. ५,००,००,०००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा १.८९% जास्त दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा १.८९% जास्त दराने |
| २) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ७.२०% जास्त दराने |
| ३) मे. देव इंजिनिअर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ९.००% जास्त दराने |

२) प्रभाग समिती क्र.०१ व ०२ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरीता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी अंथरणे.
(अंदाजित रक्कम रु. १,५०,००,०००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ७.२०% जास्त दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ३.५०% जास्त दराने |
| २) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲण्ड इन्फ्रा. प्रा.लि. | अंदाजपत्रक दरापेक्षा ८.५०% जास्त दराने |
| ३) मे. देव इंजिनिअर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ८.८०% जास्त दराने |
| ४) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ९.००% जास्त दराने |

३) प्रभाग समिती क्र.०३ व ०४ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरीता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी अंथरणे.
(अंदाजित रक्कम रु. १,५०,००,०००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ७.२०% जास्त दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ३.५०% जास्त दराने |
| २) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲण्ड इन्फ्रा. प्रा.लि. | अंदाजपत्रक दरापेक्षा ८.५०% जास्त दराने |
| ३) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ९.००% जास्त दराने |
| ४) मे. देव इंजिनिअर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ९.००% जास्त दराने |

४) प्रभाग समिती क्र.०५ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरीता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी अंथरणे.
(अंदाजित रक्कम रू. १,५०,००,०००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ७.२०% जास्त दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ३.५०% जास्त दराने |
| २) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲण्ड इन्फ्रा. प्रा.लि. | अंदाजपत्रक दरापेक्षा ८.५०% जास्त दराने |
| ३) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ९.००% जास्त दराने |

५) भाईंदर (प) येथील सुभाषचंद्र बोस मैदान ते डोंगरी पर्यंत रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये बाधित होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करणे.
(अंदाजित रक्कम रू. १,९६,८२,१००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ७.२०% जास्त दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ३.५०% जास्त दराने |
| २) मे. देव इंजिनिअर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ८.१०% जास्त दराने |
| ३) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ९.००% जास्त दराने |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ च्या कामांकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स**, अ.क्र. २,३,४ व ५ च्या कामांकरीता **मे. गणेश डेव्हलपर्स** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने)**

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि २४/८/२०१९ वेळ ११:६५
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर क्र.क्र. ४६ वर्ष २०१९/२०
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## आपत्ती व्यवस्थापन विभाग
## मा. स्थायी समिती दि. २८/०८/२०१९

### // गोषवारा //

**विषय : मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे कामीच्या निविदेस मंजुरी देणेबाबत. (Tender ID : 2019_MBMC_431354_1)**

**प्रकरण क्र. :** ८६

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे करणे कामी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त ३ निविदांपैकी सर्व निविदाधारक तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरले. पात्र निविदाधारकांचा दराचा लिफाफा उघडला असता मे. मिरॅकल इलेक्टीकल सोल्यूशन इंडीया प्रा. लि यांनी सादर केलेले सर्वात कमी असून बाजार भावाशी तुलना केली असता जास्त असल्याचे आढळून आले आहे. मे. मिरॅकल इलेक्टीकल सोल्यूशन इंडीया प्रा. लि यांचेसोबत वाटाघाटी करून खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ. क्र. | तपशिल | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|
| १ | Supply and Installation for 8 channel NVR as per the Technical Specifications | Rs. 12,290/- |
| २ | Supply and Installation for 16 channel NVR as per the Technical Specifications | Rs. 23,584/- |
| ३ | Supply and Installation for 32 channel NVR as per the Technical Specifications | Rs. 57,845/- |
| ४ | Supply and Installation for 8 channel NVR with PoE as per the Technical Specifications | Rs. 46,123/- |
| ५ | Supply and Installation for 4 Port PoE Switches as per the Technical Specifications | Rs. 7,799/- |
| ६ | Supply and Installation for 8 Port PoE Switches as per the Technical Specifications | Rs. 15,999/- |
| ७ | Supply and Installation of Wireless Mouse for NVR s | Rs. 536/- |
| ८ | Supply and Installation 6 TB Sata HDD Hard Drive | Rs. 29,980/- |
| ९ | Supply and Installation for 2 MP IP Bullet Outdoor Camera upto 40 mtr IR dist. as per the Technical Specifications | Rs. 11,790/- |
| १० | Supply and Installation for 2MP IP Dome Indoor Camera upto 30 mtr IR dist. as per the Technical Specifications | Rs. 16,670/- |
| ११ | Supply and Installation of Brackets for Bullet Outdoor Camera | Rs. 1,799/- |
| १२ | Supply and Installation of 4 x 4 PVC Surface box for Bullet Outdoor Camera | Rs. 79/- |
| १३ | Supply and Installation for Connectors | Rs. 36/- |
| १४ | Supply and Installation for Monitor - LCD 20" Monitor as per the Technical Specifications | Rs. 22,990/- |
| १५ | Supply and Installation for Monitor - LCD 32" Monitor as per the Technical Specifications | Rs. 26,087/- |
| १६ | Supply and Installation of wall mount kit for Monitor | Rs. 1,758/- |
| १७ | Supplying & installing UTP networking Cat-6 cable suitable for LAN / WAN Computer networking | Rs. 76/- |
| १८ | Supplying & erecting mains with 2x2.5 sq.mm.and earth wire 1.5 sq.mm FR PVC copper wire, in rigid PVC conduitmin.20mm dia, as per specification No: WG-MA/PC, para no. 1.4.1 DSR 1-6-3 | Rs. 130/- |

2.40

| | | |
|---|---|---|
| १९ | Flexible pipe / Laying Accessories / PVC Pipe | Rs. 127/- |
| २० | Supply and Installation for SMPS & Power Point Power supply for cameras. | Rs. 1,770/- |
| २१ | Supplying and fixing 6U Wall Mount Rack (Dimension-DxWXH - 450X550X367 mm) | Rs. 7,000/- |
| २२ | Supplying & erecting On line UPS pure sine wave of 1 KVA Capacity complete with standard features, along with necessary SMF batteries for 30mins Battery backup | Rs. 40,137/- |
| | **Maintenance** | |
| २३ | Comprehensive Maintenance for Second Year | 10% |
| २४ | Comprehensive Maintenance for Third Year | 15% |
| २५ | Comprehensive Maintenance for Fourth Year | 20% |

वरीलप्रमाणे मे. मिरॅकल इलेक्टीकल सोल्यूशन इंडीया प्रा. लि. यांनी वाटाघाटीनंतर सादर केलेले दराची बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी असल्याने उपरोक्त दर मंजुरीस शिफारस आहे.

(डॉ. सुनिल लहाने)
अतिरीक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय प्राप्त दि 22/08/2019 वेळ 02:30 वा.
का. स्थायी समिती / का. महासभा नोंद
रजिस्टर क्र. 86 वर्ष 2019-20

नगरसचिव
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
22/08/2019

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## आपत्ती व्यवस्थापन विभाग
### मा. स्थायी समिती दि. २८/०८/२०१९

**// गोषवारा //**

**विषय : मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये भाईंदर (पूर्व) भागामध्ये मा. पोलीस विभागाच्या मागणीनुसार सी.सी.टी.व्ही पुरवठा करणे व यंत्रणा कार्यान्वित करणे. (Tender ID : 2019_MBMC_449933_1)**

**प्रकरण क्र. :** ८७

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये भाईंदर (पूर्व) भागामध्ये मा. पोलीस विभागाच्या मागणीनुसार सी.सी.टी.व्ही पुरवठा करणे व यंत्रणा कार्यान्वित करणे कामी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त ३ निविदांपैकी सर्व निविदाधारक तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरले. पात्र निविदाधारकांचा दराचा लिफाफा उघडला असता मे. मिरॅकल इलेक्टीकल सोल्यूशन इंडीया प्रा. लि यांनी सादर केलेले सर्वात कमी असून बाजार भावाशी तुलना केली असता जास्त असल्याचे आढळून आले आहे. मे. मिरॅकल इलेक्टीकल सोल्यूशन इंडीया प्रा. लि यांचेसोबत वाटाघाटी करून खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ. क्र. | तपशिल | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|
| १ | Supply and Installation for IP 5MP Bullet Outdoor Camera as per the Technical Specifications | Rs. 14,994/- |
| २ | Supply and Installation for 4 channel NVR | Rs. 10,290/- |
| ३ | Supply and Installation for 8 channel NVR | Rs. 12,290/- |
| ४ | Supply and Installation 4TB Internal SATA Hard Drive | Rs. 19,526/- |
| ५ | Supply and Installation 6TB Internal SATA Hard Drive | Rs. 29,980/- |
| ६ | Supplying, fixing and configuring 8-ports 10/100/1000 Mbps Unmanaged Gigabit PoE Switch as per specifications in DSR 1-14-33 | Rs. 16,134/- |
| ७ | Supplying and fixing 6U Wall Mount Rack ( Dimension - DXWXH - 450X550X367 mm ) as per specification in DSR 1-14-19 | Rs. 7,000/- |
| ८ | Supplying & installing UTP networking Cat 6 cable suitable for LAN/WAN Computer net-working as per specification no. WGCOC/NC- DSR 1-12-3 | Rs. 56/- |
| ९ | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3 core 2.5 sq.mm.copper conductor continuous 5.48 sq mm (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lungs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specifications no. CB-LT/CU DSR 7-2-5 | Rs. 181/- |
| १० | 32 inch LED TV | Rs. 26,087/- |
| ११ | SITC of mounting kit on the ceiling/Roof with dash fastener complete with fixing of LED TV | Rs. 1,876/- |
| १२ | Outdoor Weatherproof Box For Switch | Rs. 2,015/- |
| १३ | Supplying, installing & testing UTP Connector (RJ-45) as per specification No. WG-NAS/UTPC as per DSR 1-14-1 | Rs. 92/- |
| १४ | Supply and Installation of Wired Mouse for NVR as per Specifications | Rs. 536/- |
| १५ | Supplying and erecting ISI mark modular type switch 6A / 10A duly erected on provided plate and box with wiring connections complete. DSR 1-8-1 | Rs. 73/- |

2.40

| | | |
|---|---|---|
| १६ | Supplying and erecting modular type 3 pin 6A multi socket with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. DSR 1-8-10 | Rs. 119/- |
| १७ | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 6 module duly erected in an approved manner.DSR 1-8-31 | Rs. 236/- |
| १८ | Supplying and erecting ISI mark GI pipe pole B-grade 75/80mm dia. 6mtr long with pole cap, base plate in provided foundation as per specification no. OH- PL/GI. DSR 8-1-14 | Rs. 5,116/- |
| १९ | Poviding cement concrete foundation including excavation for the poles (45 cm x 45 cm x 1.2 m) deep in 1:3:6 cement concrete (20 to 25 mm stone metal) and 45 cm x 45cm x 45 cm / 45 cm dia. x 45 cm height plinth duly plastered and with necesarry curing and finishing in an approved manner (for 6 m pole). DSR 16-3-1 | Rs. 1,301/- |
| २० | Excavating hard Rock or bituminous road (B.T.) by chiseling for preparing pit for poles stay or earth plates or for laying cables,, pipes & clearing the site by removing debris & making the site good. DSR 16-1-5 | Rs. 1,011/- |
| २१ | Comprehensive Maintenance for Second Year | 10% |
| २२ | Comprehensive Maintenance for Third Year | 15% |
| २३ | Comprehensive Maintenance for Fourth Year | 20% |

वरीलप्रमाणे मे. मिरॅकल इलेक्टीकल सोल्यूशन इंडीया प्रा. लि. यांनी वाटाघाटीनंतर सादर केलेल्या दराची बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी असल्याने उपरोक्त दर मंजुरीस शिफारस आहे.

(डॉ. सुनिल लहाने)
अतिरीक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण प्राप्त दि. 27/08/2019 वेळ 02:30
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर क्र. 82 वर्ष 2019-20
28/08/2019
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका